## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २२/०१/२०१७

**१) मोटार सायकलची चोरी . :–**

दि. २०/०१/२०१७ चे २२.०० वा. दर. यातील फिर्यादी शुभम हरीश कोकाटे वय २३ वर्ष रा. शांतीनगर गुरूनानक वार्ड मेंढा हे त्यांची पल्सर २२० काळया लाल रंगाची मोटार सायकल क्र. एमएच ३६/आर ४३०२ कि. ५०,०००/–रू ची ही मित्र अंकुर अशोक गजभीये रा. म्हाडा कॉलोनी खात रोड भंडारा यांचे घरासमोर उभी करू मित्राला भेटुन परत आल्यावर मोटार सायकल दिसुन आली नाही कुणीतरी अज्ञात चोराने कुनीही नसल्याची संधी साधुन चोरून फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गायकवाड पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**२) सोलर स्वीट लाईटच्या बॅट–यांची चोरी:–**

दिनांक १९/०१/२०१७ चे पुर्वी यातील कोणीतरी अज्ञात चोराने कुनीही नसल्याची संधी साधुन कुर्झा गावातील परीसरात लावलेले ५ सोलर स्वीट लाईटच्या बॅट–या ५ नग एकुण कि. २०,०००/–रू नगदी चोरून नेल्याने फिर्यादी शंकर रतीराम फुंडे वय ५१ वर्ष रा. कुर्झा ग्रा.प. सरपंच यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. बिसने पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**३) खुल्या दारातुन आत प्रवेश करून आलमारीत ठेवलेल्या नगदी पैश्यांची चोरी :–**

दिनांक २१/०१/२०१७ चे १४.०० वा. दर. यातील कोणीतरी अज्ञात दोन आरोपीतांनी फिर्यादी अनुप रामदासजी काटेखाये वय ३२ वर्ष रा. अडयाळ यांचे घराचे मागच्या खुल्या दारातुन आत प्रवेश करून आलमारीत ठेवलेले २०,०००/–रू नगदी चोरून नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. नंदेश्वर पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**४) भांडण करून काठीने पायावर मारून जख्मी केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक १८/०१/२०१७ चे १६.३० वा. दर. यातील फिर्यादी योगेश किसन वंजारी वय ३५ वर्ष, रा. सातोना हा त्याचे शेतावर म्हशी चारत असता यातील आरोपी माझा काकाचे शेतातील तुरी मध्ये म्हशी चारू नकोस असे बोलुन भांडण करून आरोपीने फिर्यादीस काठीने उजव्या पायावर मारून जख्मी केल्याने फिर्याचे बयाण व वैदयकीय अहवालावरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३२४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. रायपुरकर पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**५) अवैध दारू / जुगार अडयांवर धाडी . :–**

दिनांक २१/०१/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. भंडारा, जवाहनगर, मोहाडी, कारधा, करडी, वरठी, तुमसर, सिहोरा, आधंळगाव, गोबरवाही, अडयाळ व लाखांदुर येथील अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण १८ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन २१० लिटर हातभट्टी दारु + सडवा साहीत्य कि. १५,६२०/–रु. व ०१ लिटर ९० मिलीलीटर देशी दारू कि. ५२५/–रू तसेच जुगारातुन कि.४३५ /–रू असा एकुण १६,५८०/–रू चा माल जप्त करण्यात आला आहे.

नियत्रंण कक्ष अधिकारी
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९४२३११५१८२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.